महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं/३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. २१/०८/२०२५

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन परिपत्रक क्रमांक-सीएफआर-१२२४/ प्र. क्र. १६४ आस्थामं (१३), दि.२२/०८/२०२५.

**विषय :-** मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यकमांतर्गत महापार प्रणालीत शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्वतीने स्कॅन करुन Upload करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, सामान्य प्रशासन क्रमांक- सीएफआर-१२२४/ प्र. क्र. १६४ आस्थामं (१३), दि.२२/०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२२१७४६१०७२०७असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 25-08-2025 17:02:34

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**मा.मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत महापार प्रणालीत शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल ऑनलाईन पद्धतीने स्कॅन करुन Upload करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना..**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन परिपत्रक : सीएफआर- १२२४/प्र.क्र.१६४/आस्थामं (१३)**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक : २२ ऑगस्ट, २०२५.

<u>संदर्भ</u> : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र: एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.२७/का.१२(सेवा) दि.९.६.२०२५

२) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्र: सीएफआर- १२२४/प्र.क्र.१६४/आस्थामं (१३) दि.१९/०६/२०२५

३) सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र. : सीएफआर- १२२४/प्र.क्र.१६४/आस्थामं (१३)दि.२२/०७/२०२५

**<u>प्रस्तावना:-</u>**

पारदर्शक, गतिमान सुप्रशासनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवाविषयक प्रगतीचे मुल्यांकन करणे व सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरिता मा. मुख्यमंत्री महोदयांचा **१५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रम** मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, अभिकरणे, स्वायत्त संस्था, सार्वजनिक उपक्रम, आयोग यांच्या अधिकारी / कर्मचारी यांच्याबाबत राबविण्याचे संदर्भाधीन शासन निर्णय क्र १ दिनांक ०९.०६.२०२५ अन्वये ठरविण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत विभागाने केलेल्या प्रगतीनुसार गुणांकन करण्यात येणार असून, एकूण **१०० गुणांपैकी २० गुण** हे संबंधित विभागाच्या अधिनस्त कार्यरत व प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या **गट-अ, गट-ब (राजपत्रित)** संवर्गातील अधिकाऱ्यांचे सन २०१९-२० ते २०२३-२४ पर्यंतचे ऑफलाईन सादर केलेले कार्यमूल्यमापन अहवाल digitise करून महापार प्रणालीवर अपलोड करण्याकरिता प्रदान केले जाणार आहेत. त्या अनुषंगाने सर्व **"संवर्ग नियंत्रण अधिकारी"** (Cadre Controlling Authority) यांना कार्यमूल्यमापन अहवालाच्या स्कॅन करण्याबाबत संदर्भाधीन शासन परिपत्रक दिनांक १९.०६.२०२५ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २२.०७.२०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. शासन परिपत्रक दिनांक १९.०६.२०२५ मध्ये कार्यमुल्यमापन अहवालांच्या स्कॅन केलेल्या पीडीएफ फाईल प्रतिवेदन वर्षानुसार महापार प्रणालीवर अपलोड करण्याबाबत स्वतंत्र सूचना निर्गमित करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

**शासन परिपत्रक:-**

सर्व आस्थापना अधिकारी / संस्करण अधिकारी/ संवर्ग नियंत्रण अधिकारी यांना सन २०१९-२० ते २०२३-२४ पर्यंतचे ऑफलाईन पद्धतीने नोंदवलेले कार्यमूल्यमापन अहवाल स्कॅन करून महापार प्रणालीवर अपलोड करण्याकरिता पुढील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक दि.१९/०६/२०२५ व शासन शुध्दीपत्रक दि.२२/०७/२०२५ अन्वये कार्यमूल्यमापन अहवाल स्कॅन करण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.**

अ) कार्यमूल्यमापन अहवाल Black & White मध्ये स्कॅन करावा. प्रत्येक प्रतिवेदन वर्षाचा कार्यमूल्यमापन अहवाल स्वतंत्र स्कॅन करण्यात यावा. एका प्रतिवेदन वर्षात एकापेक्षा जास्त कार्यमूल्यमापन अहवाल असल्यास ते कालानुक्रमे स्कॅन करावेत आणि एका वर्षातील सर्व कार्यमूल्यमापन अहवालांची एकच PDF फाईल तयार करावी.

आ) प्रत्येक प्रतिवेदन वर्षाचा कार्यमूल्यमापन अहवाल स्कॅन केल्यानंतर तयार झालेली PDF फाईलची Size जास्तीत जास्त ३ MB असावी. PDF फाईलची Size ३ MB पेक्षा जास्त असल्यास फाईल Compress करावी.

इ) स्कॅन केल्यांनतर संगणकामध्ये प्रत्येक अधिकाऱ्यांच्या नाव, पदनाम यानुसार स्वतंत्र फोल्डर तयार करावा व या फोल्डरमध्ये प्रत्येक प्रतिवेदन वर्षाच्या PDF फाईलला संबंधित अधिकाऱ्यांचा सेवार्थ ID, नाव आणि प्रतिवेदन वर्ष याचा समावेश करावा.

उदाहरण:- श्री.स.क.पाटील, तहसिलदार (सेवार्थ ID-REVVDM९००३) यांच्या फोल्डर व फाईलला नाव देण्याकरिता,

फोल्डरचे नाव:- sk_patil_tahsildar

प्रतिवेदन वर्षाच्या PDF फाईलला नाव:-१) REVVDM९००३_sk_patil_२०१९२०.pdf

२) REVVDM९००३_sk_patil_२०२०२१.pdf

**२. सर्व आस्थापना अधिकारी / संस्करण अधिकारी/ संवर्ग नियंत्रण अधिकारी यांना सन २०१९-२० ते २०२३-२४ पर्यंतचे ऑफलाईन पद्धतीने नोंदवलेले कार्यमूल्यमापन अहवाल स्कॅन करून तयार करण्यात आलेली PDF फाईल महापार प्रणालीवर अपलोड करण्याची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.**

अ) Primary Custodian ने त्यांच्या ID वरुन MahaPAR (https://saccess.nic.in(outside nic net) https://mahapar.maharashtra.gov.in (within nic net) ) या प्रणालीवर log in करावे.

आ) उपरोक्त प्रणालीवर log in केल्यानंतर येणाऱ्या dash board वर डाव्या बाजूला Migration Tab वर Click करावे. त्यानंतर उघडणाऱ्या Window मधील सर्व माहिती भरुन अधिकाऱ्यांचे नाव नमूद करावे.

इ) अधिकाऱ्यांच्या नावाच्या बटनावर Click केल्यावर NEW बटनावर Click केल्यावर तेथे उजव्या बाजूस "Choose file" किंवा "upload" दिसेल. वरीलप्रमाणे अधिकाऱ्यांच्या नावाने स्कॅन केलेली कार्यमूल्यमापन अहवालाची PDF File "Choose file" किंवा "upload" या बटनावर Upload करावी.

ई) अशा प्रकारे upload केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांचे प्रतिवेदन वर्ष, PAR चा कालावधी, त्याचे Closed Status, प्रतिवेदन/पुनर्वलोकन अधिकाऱ्यांची नावे, तसेच गुणांकन इ. तपशील नमूद करावा.

उ) सर्व माहिती भरुन झाल्यानंतर Submit या बटनावर Click केल्यानंतर स्कॅन केलेले PAR upload होण्याची कार्यवाही पूर्ण होईल.

ऊ) याबाबतची अधिक माहिती MahaPAR प्रणालीवर उजव्या बाजूला असलेल्या help या tab अंतर्गत क्रमांक (५) Uploading__PAR__throughMigration.pdf येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**३. वरीलप्रमाणे दिलेल्या पध्दतीने सर्व ऑफलाईन भरलेले कार्यमूल्यमापन अहवाल स्कॅन करून महापार प्रणालीवर दिनांक १५.०९.२०२५ पर्यंत अपलोड करण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिकारी / संस्करण अधिकारी यांची असेल.**

**४.** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्याचा संगणक संकेतांक २०२५०८२२१७४६१०७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.08.22 17:47:00 +05'30'

**(सु.मो.महाडिक)**

**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
३) निवडनस्ती.